

# औषधी कोरफड व प्रक्रिया

प्रा. माधुरी रेवणवार
गृहविज्ञान तज्ञ
संस्कृति संवर्धन मंडळ संचलित
कृषी विज्ञान केंद्र सगरोळी
ता.बिलोली जि.नांदेड

कोरफड ( latin word- Aloevera ) सहसा दुर्लक्षित आणि मुद्दामहून लागवड फार कमी प्रमाणात करण्यात येणारे बहुवर्षीय झुडूपवर्गीय वनस्पती. लागवड केली तर फारशी काळजी न घेता कमी पाण्यावर वाढते. सर्वसाधारण कोरफड हे उष्ण व कोरड्या हवामानात आणि माळरानावर, डोंगर उतारावर कोठेही सहज येते आणि वाढते. याची पाने जाड, मांसल आणि लांब असतात. पानांच्या कडेने काटे असतात.

हि दुर्लक्षित वनस्पती आताच्या काळामध्ये तिच्या आयुर्वेदिक औषधी गुणधर्मांमुळे आणि त्यापासून तयार करण्याजोग्या वेगवेगळ्या पदार्थांमुळे खूप नावारूपाला आली आहे. पुरातन काळापासून कोरफडीचा वापर आयुर्वेदात करण्यात येतो. आजच्या घडीला सर्वांनाच आयुर्वेदाचे महत्व कळाले आहे आणि अनेक लोक कोरफडीपासून तयार झालेल्या विविध औषधी पदार्थ आणि सौंदर्य प्रसाधनांचा वापर करत आहेत.

### कोरफडीतील महत्वाचे रासायनिक द्रव्ये –

कोरफडीमध्ये एलोईन (२७ – ३० टक्के), बर्बेलीन (४ – ५ टक्के) हि ग्लुकोसायीडस, गलीक ॲसिड व उडनशील तेले हि महत्वाची रसायने असतात. रेडयुसिंग शुगर्स, हायड्रोलायझेबल शुगर, फ्रुक्टोज या शुगर्स असतात. ओक्सिडेज, केटालेज, अमायलेज हि महत्वाची एन्झायीम असतात.

त्याच बरोबर आयसो बरबालोयीन, बीटा बरबालोयीन, अन्थ्रोसीन, ग्लायकोसायीड, रेझिन्स व गम्स, इमोडीन क्रायसोपणीक ॲसिड, फ्री अमिनो ॲसिड, डी– ग्लुकोज, डी– मनोज, कोलेस्टीरोल, बीटा सीटोस्टीरॉल, लुपेओल हि रसायने कमी प्रमाणात असतात. हि सर्व रसायने औषधांच्या दृष्टीने महत्वाची आहेत (संदर्भ– कोरफड लागवड ते प्रक्रिया उद्योग – २००२).

### कोरफडीचे उपयोग –

१. कोरफडीच्या गरापासून ज्यूस किंवा रस तयार करतात. त्याचा उपयोग प्रामुख्याने आम्ल पित्त कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.
२. कोरफडीच्या कोवळ्या पानांचा गर संधिवातासाठी उपयोगी आहे.
३. कोरफडीचा रस किंवा गर सूज कमी करते.
४. त्वचा नितळ, निरोगी होण्यासाठी कोरफडीचा उपयोग होतो. त्वचेवरील पुरळ, खाज, सूज तसेच रखरखीतपाना कोरफडीमुळे कमी होतो.
५. केसांमधील कोंडा कमी करण्यासाठी, केसांना चकाकी येण्यासाठी तसेच डोक्यातील खाज, पुरळ कमी करण्यासाठी कोरफडीचा गर फायदेशीर आहे.
६. या सोबतच अनेक व्याधींवर कोरफडीपासून तयार केलेली औषधी उपयोगी आहेत.
७. सौंदर्य प्रसाधने तयार करण्यासाठी कोरफड उपयोगी.
८. आयुर्वेदिक डॉक्टरांकडून कोरफडीचे अनेक औषधे दिली जातात.
९. शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यासाठी कोरफड अतिशय फायदेशीर आहे.

## कोरफडीपासून प्रक्रियायुक्त विविध पदार्थ –

### कोरफड रस –

कोरफडीची पाने स्वच्छ धुवून घ्यावीत. पानांच्या बाजूचे काटेरी कडा आणि आवरण सुरीच्या सहाय्याने काढून घ्यावे. आतील गर चमच्याने खरडून काढावा. यामध्ये पाणी टाकून मिक्सर मध्ये घालून एकत्र करावे. हा रस ताजा घ्यावा म्हणजे अनेक आजारांमध्ये उपयोगी पडतो. हा रस टिकवून ठेवायचा असेल तर यात संरक्षक पदार्थ घालून टिकवून ठेवू शकतो.

### कोरफड शाम्पू –

कोरफडीचा अर्क, शाम्पू बेस, रंग, इसेन्स मिसळून शाम्पू तयार करतात. यासाठी २०० मिली अर्क आणि ८०० मिली शाम्पू बेस वापरावा.

### कोरफड जेल –

कोरफड जेल करण्यासाठी रस करताना काढलेला काटेरी भाग, पानांची साल देखील वापरता येते. कोरफडीची पाने कट करून मोजून घ्यावीत. पाने आणि त्यापेक्षा १ लिटर जास्त पाणी घालून अर्क काढण्याच्या मशीन मधून अर्क काढून घ्यावा. अर्कामध्ये कोरफडीचे सर्व गुणधर्म उतरतात. या अर्काचे जेल तयार करण्यासाठी त्यात जेल पावडर टाकून चांगले मिसळून घ्यावे. मिसळताना त्याच्या गाठी होवू नये याची काळजी घ्यावी. यातच रंग, इसेन्स टाकावा. तयार जेल त्वचेवर आणि केसांना लावण्यासाठी उपयोगी पडते.



### कोरफड तेल –

शुद्ध खोबरेल तेल घेवून त्यात कोरफडीची पाने कट करून टाकावीत. हे मिश्रण मध्यम आचेवर उकळावे. सुरुवातीला फेस होतो. जोपर्यंत फेस कमी होवून तेल दिसते तो पर्यंत उकळावे. हे तेल गाळून नियमित केसांना लावावे. यामुळे कोंडा कमी होवून केस गळती थांबते.



### कोरफड पावडर –

कोरफडीची पाने स्वच्छ धुवून घ्यावीत. या पानांचे पातळ काप करून ड्रायर मध्ये ठेवून वळवून घ्यावीत. हि वाळलेली पाने ग्राइंडर मध्ये टाकून बारीक पावडर करून घ्यावी. या पावडरचा उपयोग अनेक आयुर्वेदिक औषधांमध्ये व सौंदर्य प्रसाधनांमध्ये करतात. तयार पावडर हवाबंद डब्यात ठेवावे.



संस्कृति संवर्धन मंडळ संचलित कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी येथील उत्कर्ष ॲग्रो इंडस्ट्री आणि ट्रेनिंग सेंटर मध्ये कोरफडी पासून शुद्ध अर्क काढून साबण, शाम्पू, जेल तयार करण्यात येते. तसेच त्याचे प्रशिक्षण गरजू व इच्छुक युवक युवत्तीना दिले जाते. कोरफडीपासून तयार केलेल्या विविध प्रोडक्ट्सला चांगली पॅकेजिंग आणि लेबलिंग केल्यास विक्री होवू शकते. बचत गटातील महिलांना तसेच शेतकऱ्यांना देखील अशा प्रकारच्या प्रक्रिया करून उद्योग सुरु करता येतो.




(संपर्क :+९१ ९४०३९६२०१४)